सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## २०२४















निर्मिती : उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
संकल्पना : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
चित्र सौजन्य : महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन

रचना : कला विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०



रायगड



## जानेवारी २०२४

पौष-माघ १९४५ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | १<br>११ | २<br>१२ | ३<br>१३ | ४<br>१४ | ५<br>१५ | ६<br>१६ |
| ७<br>१७ | ८<br>१८ | ९<br>१९ | १०<br>२० | ११<br>२१ | १२<br>२२ | १३<br>२३ |
| १४<br>२४ | १५<br>२५ | १६<br>२६ | १७<br>२७ | १८<br>२८ | १९<br>२९ | २०<br>३० |
| २१<br>१ | २२<br>२ | २३<br>३ | २४<br>४ | २५<br>५ | २६<br>६ | २७<br>७ |
| २८<br>८ | २९<br>९ | ३०<br>१० | ३१<br>११ | | | |


• २६ प्रजासत्ताक दिन

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध ऐतिहासिक किल्ला आणि शिवछत्रपतींनी स्थापलेल्या हिंदवी स्वराज्याची राजधानी म्हणजे किल्ले रायगड. रायगड जिल्ह्यातील महाड शहराजवळ सह्याद्री पर्वत रांगांमध्ये असलेला एक भव्य डोंगरी किल्ला. त्याच्या चारही बाजूला असलेल्या किल्ल्यांमुळे त्याच्या भोवती संरक्षणाची फळी उभी राहिली होती. त्याच्या भक्कम बांधकामामुळे दख्खनच्या पठारावरील सर्वात मजबूत किल्ल्यांपैकी तो एक बनला. इ. सन १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकानंतर तो त्यांच्या प्रशासकीय कामकाजांचे केंद्र बनला.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



शिवनेरी



## फेब्रुवारी २०२४

माघ-फाल्गुन १९४५ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १<br>१२ | २<br>१३ | ३<br>१४ |
| ४<br>१५ | ५<br>१६ | ६<br>१७ | ७<br>१८ | ८<br>१९ | ९<br>२० | १०<br>२१ |
| ११<br>२२ | १२<br>२३ | १३<br>२४ | १४<br>२५ | १५<br>२६ | १६<br>२७ | १७<br>२८ |
| १८<br>२९ | १९<br>३० | २०<br>१ | २१<br>२ | २२<br>३ | २३<br>४ | २४<br>५ |
| २५<br>६ | २६<br>७ | २७<br>८ | २८<br>९ | २९<br>१० | | |


• १९ छत्रपती शिवाजी महाराज जयंती

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान म्हणजे शिवनेरी किल्ला. याच्या परिसरातील हिनयान पंथीय बौद्ध लेणी आणि सातवाहन राजांचा नाणेघाटातील कोरीव लेख यावरून हा इ.स. पहिल्या व दुसऱ्या शतकात बांधला असावा असे म्हटले जाते. याची भक्कम तटबंदी, पाच प्रमुख दरवाजे व बुरुज लक्ष वेधून घेतात. शिवाईचे मंदिर, अंबरखाना, मशीद, इदगाह या वास्तू आणि अनेक पाण्याच्या टाक्या अजूनही किल्ल्यावर आहेत. शिवाजी महाराजांच्या जन्मस्थानाचा जिर्णोद्धार केला असून दरवर्षी येथे शिवजयंती उत्सव दिमाखात साजरा होतो. अलिकडे बालशिवाजी-जिजाबाई यांचा पुतळा येथे उभारण्यात आला आहे.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



लोणार सरोवर



## मार्च २०२४

फाल्गुन १९४५ - चैत्र १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१<br>११ | | | | | १<br>११ | २<br>१२ |
| ३<br>१३ | ४<br>१४ | ५<br>१५ | ६<br>१६ | ७<br>१७ | ८<br>१८ | ९<br>१९ |
| १०<br>२० | ११<br>२१ | १२<br>२२ | १३<br>२३ | १४<br>२४ | १५<br>२५ | १६<br>२६ |
| १७<br>२७ | १८<br>२८ | १९<br>२९ | २०<br>३० | २१<br>१ | २२<br>२ | २३<br>३ |
| २४<br>४ | २५<br>५ | २६<br>६ | २७<br>७ | २८<br>८ | २९<br>९ | ३०<br>१० |


- ८ महाशिवरात्री
- २५ होळी (दुसरा दिवस)
- २९ गुड फ्रायडे

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

महाराष्ट्रातील जागतिक वारसा स्थळांपैकी एक म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील जगप्रसिद्ध लोणार सरोवर. बेसॉल्ट खडकातील एकमेव मोठे आघाती विवर आहे. याची निर्मिती उल्कापातामुळे झाली असून संशोधनाअंती सरोवराचे वय सुमारे ५,७०,००० वर्षे इतके वर्तवण्यात आले आहे. आकाराने गोल असणाऱ्या या सरोवराचे पाणी खारे आहे. भारतातील जिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया, फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी तसेच अमेरिकेतील स्मिथसोनियन संस्था आणि युनायटेड स्टेट्स जिओग्राफिकल सर्व्हे यासारख्या संस्थांनी यावर बरेच संशोधन केले आहे. सरोवराचे जतन व संवर्धनासाठी लोणार विवर वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. या परिसरात अंदाजे बाराशे वर्षांपूर्वीची मंदिरे आहेत. यातील १५ मंदिरे विवरातच आहेत.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



वेरुळ लेणी



## एप्रिल २०२४

चैत्र-वैशाख १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | १<br>१२ | २<br>१३ | ३<br>१४ | ४<br>१५ | ५<br>१६ | ६<br>१७ |
| ७<br>१८ | ८<br>१९ | ९<br>२० | १०<br>२१ | ११<br>२२ | १२<br>२३ | १३<br>२४ |
| १४<br>२५ | १५<br>२६ | १६<br>२७ | १७<br>२८ | १८<br>२९ | १९<br>३० | २०<br>३१ |
| २१<br>१ | २२<br>२ | २३<br>३ | २४<br>४ | २५<br>५ | २६<br>६ | २७<br>७ |
| २८<br>८ | २९<br>९ | ३०<br>१० | | | | |

● ९ गुढीपाडवा ● ११ रमझान ईद (ईद-उल-फितर) (शव्वल १) ● १४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती ● १७ रामनवमी
● २१ महावीर जन्म कल्याणक


## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

वेरुळ लेणी समूह हे प्राचीन भारतीय वास्तुकला आणि सौंदर्यासक्त कलात्मकतेचा अप्रतिम वारसा आहे. हे हिंदू, बौद्ध आणि जैन धार्मिक सुसंवादी परंपरांचे प्रतिनिधित्व करते. या बालाघाटच्या टेकड्यांमध्ये कोरलेल्या असून ३४ प्रमुख लेण्यांचा समूह आहे. चालुक्य आणि कलचुरी, राष्ट्रकूट आणि यादव या राजवंशांच्या राजवटीत इ.स. ६ ते १० व्या शतकादरम्यान या लेण्यांची निर्मिती झाली आहे. लेणी धार्मिक परंपरांवर आधारित तीन भिन्न गटांमध्ये वर्गीकृत होते. यात १ ते १२ लेणी बौद्ध, १३ ते २९ हिंदू आणि ३० ते ३४ जैन लेण्यांचा समावेश आहे. या समूहातील सर्वात प्रसिद्ध लेणी कैलास मंदिर आहे. हे भगवान शिवाला समर्पित असलेली अखंड रचना आहे. एकाच खडकातील जगातील सर्वात मोठे उत्खनन म्हणूनही हे ओळखले जाते.


सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०



अजिंठा लेणी



## मे २०२४

वैशाख-ज्येष्ठ १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ (११) | २ (१२) | ३ (१३) | ४ (१४) |
| ५ (१५) | ६ (१६) | ७ (१७) | ८ (१८) | ९ (१९) | १० (२०) | ११ (२१) |
| १२ (२२) | १३ (२३) | १४ (२४) | १५ (२५) | १६ (२६) | १७ (२७) | १८ (२८) |
| १९ (२९) | २० (३०) | २१ (३१) | २२ (१) | २३ (२) | २४ (३) | २५ (४) |
| २६ (५) | २७ (६) | २८ (७) | २९ (८) | ३० (९) | ३१ (१०) | |

• १ महाराष्ट्र दिन • २३ बुद्ध पौर्णिमा

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा


छत्रपती संभाजीनगर शहरापासून सुमारे १०० कि.मी. अंतरावर जगप्रसिद्ध अजिंठा लेणी आहेत. ही भारतातील प्राचीन शिल्पकला आणि मुर्तीकलेसाठी प्रसिद्ध असली तरी येथील लेणी मुख्यत्वे चित्रकलेकरिता प्रख्यात आहेत. इसवी सन पूर्व दुसऱ्या शतक काळातील या लेणी असून ३० बौद्ध लेण्यांचा समूह असे याचे स्वरूप आहे. बौद्ध संस्कृतीचा महत्त्वपूर्ण इतिहास यातून प्रतिबिंबित होतो. याचजवळ अनेक प्राचीन देवळे आणि मठसुद्धा पाहायला मिळतात. इ.स. १९८३ मध्ये युनेस्कोने या लेण्यांना जागतिक वारसा म्हणून घोषित केले आहे. बौद्ध धर्माचे बरेच अनुयायी अध्यात्मिक ऊर्जा कायम ठेवण्यासाठी तर कलाकार कलात्मक प्रेरणा मिळवण्यासाठी येथे आवर्जून भेट देतात.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



शनिवार वाडा



## जून २०२४

ज्येष्ठ-आषाढ १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० (९) | | | | | | १ (११) |
| २ (१२) | ३ (१३) | ४ (१४) | ५ (१५) | ६ (१६) | ७ (१७) | ८ (१८) |
| ९ (१९) | १० (२०) | ११ (२१) | १२ (२२) | १३ (२३) | १४ (२४) | १५ (२५) |
| १६ (२६) | १७ (२७) | १८ (२८) | १९ (२९) | २० (३०) | २१ (३१) | २२ (१) |
| २३ (२) | २४ (३) | २५ (४) | २६ (५) | २७ (६) | २८ (७) | २९ (८) |


• १७ बकरी ईद (ईद-उल-झुआ)

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

पहिले बाजीराव पेशवे यांनी इ.सन १७३६ मध्ये १३ खोल्यांचा पेशव्यांचा राजवाडा म्हणजेच शनिवार वाडा बांधला. हा वाडा पेशव्यांचे मुख्य ठिकाण होते. सुरक्षिततेला जास्त प्राधान्य देऊन शनिवार वाड्याची रचना करण्यात आलेली आहे. याचे मुख्य प्रवेशद्वार दिल्ली दरवाजा या नावाने व इतर दरवाजे गणेश, मस्तानी, जंभळ खिडकी अशा नावाने ओळखले जातात. वाड्यासमोर पहिल्या बाजीरावांचा घोड्यावर बसलेला पुतळा आहे. वाड्यात गणेश महाल, रंग महल, आरसा महल, हस्तीदंत महल, दिवाणखाना आणि कारंजे अशी अनेक ठिकाणे पाहावयास मिळतात. पेशव्यांचा इतिहास सांगणारा ‘लाईट व म्युझिक शो’ वाड्यावर दररोज आयोजित केला जातो.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



रामटेक



## जुलै २०२४

आषाढ-श्रावण १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ (१०) | २ (११) | ३ (१२) | ४ (१३) | ५ (१४) | ६ (१५) |
| ७ (१६) | ८ (१७) | ९ (१८) | १० (१९) | ११ (२०) | १२ (२१) | १३ (२२) |
| १४ (२३) | १५ (२४) | १६ (२५) | १७ (२६) | १८ (२७) | १९ (२८) | २० (२९) |
| २१ (३०) | २२ (३१) | २३ (१) | २४ (२) | २५ (३) | २६ (४) | २७ (५) |
| २८ (६) | २९ (७) | ३० (८) | ३१ (९) | | | |

• १७ मोहरम


## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

प्रभू श्रीराम वनवासात असताना या ठिकाणी काही काळ वास्तव्यास असल्यामुळे या शहराला रामटेक असे नाव पडले. नागपूरपासून ५० कि.मी. अंतरावर असलेल्या या शहराच्या पूर्वेला उंच डोंगरावर प्रभू श्रीरामांचे सुमारे ६०० वर्षे जुने मंदिर आहे. सिंदूरगिरी किंवा शेंदराचा डोंगर व तपोगिरी म्हणजेच तपस्या करण्याचा डोंगर असेही नामाभिधान या डोंगरास पूर्वी असावे. तशा प्रकारचा शिलालेख चौदाव्या शतकातील लक्ष्मण मंदिराजवळ आहे. राम मंदिर परिसरातच एक विशाल नंदी व श्रीगणेशाचे पुरातन मंदिर आहे. नागपूरकर भोसले यांच्या खास शस्त्रांचा साठा या मंदिरात आहे. कार्तिक महिन्यातील त्रिपुरी पौर्णिमेस येथे यात्रा भरते व त्या रात्री १२ वाजता उंच कळसावर त्रिपूर प्रज्वलित केला जातो. कवि कुलगुरू कालिदासांनी संस्कृत काव्यातील एक अभिजात कलाकृती ‘मेघदूत’ याच रामटेक परिसरात लिहिली आहे.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन





गेटवे ऑफ इंडिया

## ऑगस्ट २०२४

श्रावण-भाद्रपद १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ (१०) | २ (११) | ३ (१२) |
| ४ (१३) | ५ (१४) | ६ (१५) | ७ (१६) | ८ (१७) | ९ (१८) | १० (१९) |
| ११ (२०) | १२ (२१) | १३ (२२) | १४ (२३) | १५ (२४) | १६ (२५) | १७ (२६) |
| १८ (२७) | १९ (२८) | २० (२९) | २१ (३०) | २२ (३१) | २३ (१) | २४ (२) |
| २५ (३) | २६ (४) | २७ (५) | २८ (६) | २९ (७) | ३० (८) | ३१ (९) |


● १५ स्वातंत्र्य दिन, पारशी नववर्ष दिन (शहेनशाही)

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा


मुंबईच्या अनेक आकर्षणांपैकी एक म्हणजे 'गेटवे ऑफ इंडिया'. किंग जॉर्ज पंचम आणि क्वीन मेरी यांच्या इ.सन १९११ मध्ये भारत भेटीच्या स्मरणार्थ 'गेटवे ऑफ इंडिया' या स्मारकाची उभारणी करण्यात आली. स्मारक इ. सन १९२४ मध्ये बांधून पूर्ण झाले. इंडो-सारसेनिक, भारतीय आणि इस्लामिक वास्तुशैलींचे ते मिश्रण आहे. प्रत्येक बाजूला चार बुरुज आणि मोठे हॉल आहेत. दक्षिण मुंबईतील अपोलो बंदर परिसरातील 'गेटवे ऑफ इंडिया' येथून अरबी समुद्राचे विहंगम दृष्य दिसते. येथे वर्षभर पर्यटकांची गर्दी असते.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



कोपेश्वर मंदिर



## सप्टेंबर २०२४

भाद्रपद-आश्विन १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १<br>१० | २<br>११ | ३<br>१२ | ४<br>१३ | ५<br>१४ | ६<br>१५ | ७<br>१६ |
| ८<br>१७ | ९<br>१८ | १०<br>१९ | ११<br>२० | १२<br>२१ | १३<br>२२ | १४<br>२३ |
| १५<br>२४ | १६<br>२५ | १७<br>२६ | १८<br>२७ | १९<br>२८ | २०<br>२९ | २१<br>३० |
| २२<br>३१ | २३<br>१ | २४<br>२ | २५<br>३ | २६<br>४ | २७<br>५ | २८<br>६ |
| २९<br>७ | ३०<br>८ | | | | | |


• ७ गणेश चतुर्थी • १६ ईद-ए-मिलाद

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यामधील खिद्रापूर या गावी असलेल्या महादेवाचे प्राचीन मंदिर 'कोपेश्वर मंदिर' म्हणून परिचित आहे. शिलाहार स्थापत्यशैलीचे मंदिर कृष्णा नदीच्या काठावर वसलेले आहे. सुमारे सातव्या शतकाच्या आसपास चालुक्य राजवटीत कोपेश्वर मंदिराच्या उभारणीस सुरुवात होऊन पुढे बाराव्या शतकात शिलाहार राजवटीत हे काम पूर्णत्वास गेले. येथील स्थापत्यशैली दक्षिणेकडील बेलूर आणि हळेबिडशी यांच्याशी साम्य दर्शवणारी आहे. देवळाबाहेर ४८ खांबांवर तोललेला छत नसलेला मंडप आहे. याचा वापर यज्ञ कार्यासाठी होत असे त्यामुळे होम-हवनांचा धूर बाहेर जाण्यासाठी ती जागा ठेवलेली आहे. केवळ आतूनच नाही तर बाहेरूनसुद्धा ही वास्तू सुंदर अशा कोरीव कमानींनी परिपूर्ण आहे.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन



सिंधुदुर्ग किल्ला



## ऑक्टोबर २०२४

आश्विन-कार्तिक १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १<br>९ | २<br>१० | ३<br>११ | ४<br>१२ | ५<br>१३ |
| ६<br>१४ | ७<br>१५ | ८<br>१६ | ९<br>१७ | १०<br>१८ | ११<br>१९ | १२<br>२० |
| १३<br>२१ | १४<br>२२ | १५<br>२३ | १६<br>२४ | १७<br>२५ | १८<br>२६ | १९<br>२७ |
| २०<br>२८ | २१<br>२९ | २२<br>३० | २३<br>१ | २४<br>२ | २५<br>३ | २६<br>४ |
| २७<br>५ | २८<br>६ | २९<br>७ | ३०<br>८ | ३१<br>९ | | |

• २ महात्मा गांधी जयंती • १२ दसरा

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेला सिंधुदुर्ग किल्ला हा अरबी समुद्रातील खुर्दे बेटावर मालवण किनाऱ्याजवळ स्थित, थक्क करणारे वास्तुशिल्प आहे. किल्ल्याचे भव्य बांधकाम इ.सन १६६४ मध्ये हिरोजी इंदुलकर यांच्या देखरेखीखाली सुरू झाले. या बांधकामासाठी १०० वास्तुविशारद आणि ३०० लोकांचे मनुष्यबळ लागल्याची नोंद आहे. हा मराठा नौदलाचे मुख्यालय होता. याला असलेले अनेक अनुकुचीदार बुरुज हे छत्रपतींची रणनीती आणि असामान्य बुद्धीचे दर्शन घडवते. मराठ्यांची दूरदृष्टी आणि संसाधनांचे मूर्त उदाहरण या रूपाने पाहायला मिळते. वेळेच्या पुढे जाऊन केलेले बांधकाम आणि शिल्पकलेची ही प्राचीन रचना पाहताना आपण अवाक होतो.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन





मुरुड-जंजिरा

## नोव्हेंबर २०२४

कार्तिक-अग्रहायण १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ (१०) | २ (११) |
| ३ (१२) | ४ (१३) | ५ (१४) | ६ (१५) | ७ (१६) | ८ (१७) | ९ (१८) |
| १० (१९) | ११ (२०) | १२ (२१) | १३ (२२) | १४ (२३) | १५ (२४) | १६ (२५) |
| १७ (२६) | १८ (२७) | १९ (२८) | २० (२९) | २१ (३०) | २२ (१) | २३ (२) |
| २४ (३) | २५ (४) | २६ (५) | २७ (६) | २८ (७) | २९ (८) | ३० (९) |


● १ दिवाळी अमावस्या (लक्ष्मीपूजन) ● २ दिवाळी (बलिप्रतिपदा) ● ३ भाऊबीज ● १५ गुरुनानक जयंती

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

अरबी समुद्रातील एक अभेद्य किल्ला म्हणून रायगड जिल्ह्यातील मुरुड-जंजिरा हा किल्ला ओळखला जातो. याचे भक्कम बांधकाम आणि किल्ल्यावरील ५७२ तोफा यामुळे हा अभेद्य राहिला. या तोफांमध्ये विशेष मोठी आणि लांब पल्ल्याची 'कलाल बांगडी' ही तोफ होती. या किल्ल्याची तटबंदी बुलंद असून १९ बुरुज आहेत. तटबंदीवर जाण्यासाठी जागोजागी पायऱ्या आहेत.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन





घारापुरी लेणी

## डिसेंबर २०२४

अग्रहायण-पौष १९४६ शके

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १ (१०) | २ (११) | ३ (१२) | ४ (१३) | ५ (१४) | ६ (१५) | ७ (१६) |
| ८ (१७) | ९ (१८) | १० (१९) | ११ (२०) | १२ (२१) | १३ (२२) | १४ (२३) |
| १५ (२४) | १६ (२५) | १७ (२६) | १८ (२७) | १९ (२८) | २० (२९) | २१ (३०) |
| २२ (१) | २३ (२) | २४ (३) | २५ (४) | २६ (५) | २७ (६) | २८ (७) |
| २९ (८) | ३० (९) | ३१ (१०) | | | | |

• २५ ख्रिसमस

## महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा

घारापुरी लेणी ज्याला एलिफंटा लेणीदेखील म्हणतात. घारापुरी बेटावरील प्रामुख्याने हिंदू देवता शिवाला समर्पित गुहा मंदिरांचा समूह आहे. ५ व ७ व्या शतकादरम्यान बांधण्यात आलेली ही प्राचीन दगडी मंदिरे त्या काळातील कलात्मकतेचा आणि धार्मिक उत्साहाचा पुरावा म्हणून उभी आहेत. बेसॉल्ट खडकात कोरलेल्या ह्या लेणीत मुख्य मंदिर, महाकाय गुहा जी, २७ चौरस मीटर आहे. सर्वात प्रसिद्ध शिल्प ५.४५ मीटर उंच त्रिमूर्ती सदाशिव आहे. गुहेच्या आतील भिंतीवर हिंदू पौराणिक कथा, देव-देवतांचे चित्रण केले आहे.